पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड प्रभाग कार्यालय, रहाटणी -१७
क्र.डप्र/१/कावि/२२३०/२०१३,
दिनांक - २०/१२/२०१३.

**विषय – कार्यालयीन शिस्तीबाबत.**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभागांतर्गत स्थापत्य/विद्यूत/पा.पू./आरोग्य व प्रशासन विभाग कार्यरत आहेत. यापैकी प्रत्येक विभागातील प्रत्येक कर्मचा-याची कामकाजाची वेळ त्याच्या पदानुसार तसेच त्यांच्या कामकाजाच्या स्वरूपानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर जाताना नियंत्रित वरिष्ठ अधिका-यांची परवानगी घेऊन व कार्यालयातील फिरती रजिस्टरवर नोंद करून जाणे सर्वांना बंधनकारक आहे. तसेच रजेवर जाताना नियंत्रित वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत सर्व कर्मचा-यांना प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या परिपत्रकांची लेखी/तोंडी सुचना अनेक वेळा देणेत आलेल्या आहेत. तरीही माझ्या असे निदर्शनास आलेले आहे की, प्रभाग कार्यालयाच्या आखत्यारितील सर्व विभागातील काही अधिकारी/कर्मचारी विनापरवाना गैरहजर रहात आहेत. तसेच वरिष्ठ अधिका-यांची परवानगी न घेता व फिरती रजिस्टरला नोंद न करता कार्यालय सोडुन जात आहेत. सदरची बाब ही कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे.

सबब प्रस्तुत परिपत्रकान्वये सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांना सक्त सुचित करणेत येते की, यापुढे सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी कार्यालयात वेळेवर येणे–जाणे, रजेवर जाताना वरिष्ठांची पुर्व परवानगी घेणे, कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाकरीता बाहेर जाताना वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी घेऊन व फिरती रजिस्टरला नोंद घेऊनच कार्यालय सोडणे बंधनकारक राहील. यामध्ये कोणत्याही प्रकारचा कसूर झालेचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(२) नुसार कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याबद्दल संबंधितावर शिस्तभंगाची कडक कारवाई करणेत येईल. याची सर्व संबंधितानी स्पष्टपणे नोंद घेणेत यावी.

सही/-
प्रभाग अधिकारी
पि.चि.म.न.पा. ड प्रभाग कार्यालय
रहाटणी – १७.

प्रति,
सर्व संबंधित.